Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 15 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी आज मतदान होत आहे. या निवडणुकीमध्ये मोठ्या संख्येनं मतदान करुन आपणही आपल्या शहरांच्या, महानगरांच्या जडणघडणीत योगदान द्यावं आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा असं आवाहन राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केलं आहे. सर्व महापालिकांच्या ८९३ प्रभागांतल्या दोन हजार ८६९ नगरसेवक पदांसाठी १५ हजार ९३१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. एकूण तीन कोटी ४८ लाखांपेक्षा अधिक मतदार, या सर्व उमेदवारांचं राजकीय भवितव्य ठरवणार आहेत.
मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर शहरात एक हजार २६७ मतदान केंद्र असून, जालना इथं २९१, परभणी इथं ३४१, लातूर ३७५ आणि नांदेड इथं ६०० मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. महापालिकांसाठी प्रभागनिहाय मतदानाची ही पहिलीच वेळ आहे.

****

जालना महापालिकेत सकाळी साडे नऊ वाजेपर्यंत आठ पूर्णांक २४, तर परभणी महापालिकेत सुमारे सात टक्के मतदान झालं.परभणी इथं प्रभाग क्रमांक चार मधल्या एका मतदान केंद्रावर ईव्हीएम आणि कंट्रोल युनिट मध्ये बिघाड झाल्याने याठिकाणचं मतदान बंद पडलं आहे. प्रशासन पुढील व्यवस्था करत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. परभणीत आज थंडीचा प्रभाव कमी असल्याने मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा वाढत आहेत. सकाळच्या टप्प्यात मतदारांचा चांगला प्रतिसाद दिसून आला. पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी परभणी शहरातील मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजवण्याचं आवाहन केलं.

****

नाशिक शहरात काही केंद्रांवर मतदान यंत्रात बिघाडाच्या घटना वगळता मतदान शांततेत सुरू आहे. काही ठिकाणी मतदार यादीत नावं सापडत नाही किंवा मतदान केंद्र दूरवर देण्यात आल्याने मतदारांमध्ये नाराजी असल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

****

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर इथं मतदानाचा हक्क बजावला.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनीही मतदान केलं.यावेळी त्यांनी जनतेला मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचं आवाहन केलं.

****

भारतीय सेना दिनानिमित्त आज देशाच्या संरक्षणासाठी सदैव सज्ज असलेल्या आपल्या सैनिकांच्या अतुलनीय शौर्याला, शिस्तीला आणि सर्वोच्च बलिदानाला देश नमन करत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सेना दिनानिमित्त देशातले सर्व सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सुरक्षा, एकात्मता, आपत्ती निवारणातील योगदान आणि “राष्ट्र प्रथम” या प्रेरणादायी भावनेद्वारे भारतीय सैन्य देशसेवेसाठी सदैव कटिबद्ध असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या रक्षणासाठी कठीण परिस्थितीतही सदैव सज्ज असलेल्या सैनिकांच्या शौर्याचा, निष्ठेचा आणि निःस्वार्थ सेवेचा सन्मान केला. कर्तव्य बजावताना बलिदान देणाऱ्या हुतात्मा सैनिकांना त्यांनी आदरांजली अर्पण केली.

****

दिल्लीत आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रकुल देशांच्या सभापती आणि पीठासीन अधिकार्यांच्या अठ्ठाविसाव्या परिषदेचं उद्घाटन होत आहे. या परिषदेत ४२ राष्ट्रकुल राष्ट्रांचे ६१ अध्यक्ष, पीठासीन अधिकार्यांसह, चार अर्धस्वायत्त देशांचे संसद अध्यक्षही सहभागी होत आहेत. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला या परिषदेचे अध्यक्ष आहेत. संसदीय लोकशाही बळकट आणि अधिक प्रभावी करण्याच्या उद्दीष्टाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक प्रगत संवाद,नवोन्मेष आणि सहकार्यासाठी ही परिषद मुख्य जागतिक मंच म्हणून काम करेल, असं बिर्ला यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

राज्यात सिकलसेलचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये आजपासून विशेष तपासणी `अरुणोदय` मोहीम सुरू होत आहे. २७ फेब्रुवारीपर्यंत चालणार्या या मोहिमेत सिकलसेलचं लवकर निदान आणि उपचारांचं महत्त्व सांगितलं जाणार आहे. २०१९ ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत जवळपास दीड कोटी लोकांची तपासणी करण्यात आली होती. त्यात बारा हजार ४२० सिकलसेल रुग्ण आणि एक लाख चोविस हजार २७५ सिकलसेल वाहक होते. त्यापैकी बहुतेक रुग्ण आदिवासी बहुल जिल्ह्यांतील असल्याचे आरोग्य विभागानं सांगितलं.

****

जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी परभणी जिल्ह्यातल्या सेलू इथं रेती माफिया, अवैध दारू आणि गुटखा विक्रेते तसंच गुंडप्रवृत्तीच्या लोकांविरुद्ध कडक कारवाई करत मागील काही महिन्यात सहा जणांना हद्दपार करण्यात आलं. उपविभागीय दंडाधिकारी शैलेश लाहोटी यांनी ही कारवाई केली. यासंदर्भात आणखी काही प्रस्ताव प्रलंबित असून, त्याबाबत सुनावणी सुरू असून चौकशीअंती निर्णय घेण्यात येणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नाशिकमध्ये शिवसेनेच्या एका उमेदवाराविरूद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे. एका बांधकाम ठेकेदाराला बळजबरीने मोटारीत डांबून मारहाण करत अपहरण करुन नंतर सोडून पलायन केल्याप्रकरणी नाशिक पोलीसांनी ही कारवाई केली. शिवसेनेचे प्रभाग क्रमांक पाच मधले उमेदवार कमलेश बोडके यांच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात आली.

****